जपानच्या होकाईडो प्रांताचे उपराज्यपाल कानो ताकायुकी यांनी घेतली कौशल्य मंत्री मंगलप्रभात लोढा यांची सदिच्छा भेट >>पान 2

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त मैदानावर भव्य श्रमदान >>पान 3

रैलानी बाबा यात्रेच्या तयारीला वेग >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

सुविचार

प्रकाशाच्या झोतात राहणाऱ्यांना अंधाराचा गैरफायदा घेता येत नाही. - अज्ञात

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



जंगल सफारीत चित्याला घाबरून मौनी पळाली

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 159 ■ गुरूवार, दि. 15 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी महासंग्राम

## ■ मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज, ■ मिनी विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी!

राज्यातील २९ महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी उद्या (ता. १५) मतदान होत असून त्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. एकूण २ हजार ८६९ जागांसाठी ही निवडणूक होत असून एकूण ३ कोटी ४८ लाख ७९ हजार ३३७ मतदारांकरिता एकूण ३९ हजार ९२ मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक रिंगणात एकूण १५ हजार ९०८ इतके उमेदवार आहेत. तसेच पुरेशा पोलिस बंदोबस्ताचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या कार्यक्रमाची घोषणा दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी केली होती. त्यानुसार बृहन्मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, वसई- विरार, कोल्हापूर, कल्याण- डोंबिवली, ठाणे, उल्हासनगर, नाशिक, पुणे, पिंपरी- चिंचवड, सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, लातूर, परभणी, भिवंडी- निजामपूर, मालेगाव, पनवेल, मीरा- भाईंदर, नांदेड- वाघाळा, सांगली- मीरज, कुपवाड, जळगाव, धुळे, अहिल्यानगर, इचलकरंजी आणि जालना महानगरपालिकेसाठी मतदान होत आहे.

मतदान उद्या (ता. १५) सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल. मतमोजणीस संबंधीत ठिकाणी १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता सुरवात होईल. एकूण मतदारांमध्ये १ कोटी ८१ लाख ९४ हजार २९२ पुरुष, १ कोटी ६६ लाख ८० हजार ४४९ महिला; तर ४ हजार ५९६ इतर >>पान २



## घरोघरी जाऊन प्रचार करण्याच्या तरतुदीसंदर्भातील आदेश जुनाच

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महानगरपालिका निवडणुकांच्या प्रचाराची समाप्ती झाल्यानंतर घरोघरी जाऊन प्रचार करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने कुठलाही नवीन आदेश निर्गमित केलेला नाही. त्यासंदर्भातला आदेश जुनाच असून तो राज्य निवडणूक आयोगाने १४ फेब्रुवारी २०१२ मध्येच निर्गमित केलेला आहे.

जाहीर प्रचाराच्या समाप्तीनंतर घरोघरी जाऊन प्रचार करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने नवीन नियम लागू केला असल्याचे वृत्त समाजमाध्यमांसह विविध माध्यमातून प्रसारित होत आहे; परंतू हे वस्तुस्थितीला धरुन नाही. याबाबतचा आदेश जुनाच आहे. त्या १४ फेब्रुवारी २०१२ रोजीच्या आदेशानुसार जाहीर प्रचार समाप्तीनंतर उमेदवार हे मतदान केंद्राच्या १०० मीटर बाहेर मतदारांना भेटून आणि घरोघरी जाऊन प्रचार करु शकतील; परंतु माईकचा वापर करता येणार नाही आणि उमेदवारांना समूहानेदेखील फिरता येणार नाही.

## राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अर्जासाठीचे पोर्टल २२ जानेवारीपर्यंत सुरु

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना (एनएमएमएसएस) अंतर्गत २०२५-२६ साठी नुतनीकरणासाठी पात्र असलेले तसेच २०२४-२५ मधील डी-डुप्लिकेशन प्रक्रियेत समाविष्ट असलेले तथापि विहित कालावधीत अर्ज करू शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी एनएसपी २.० पोर्टल २२ जानेवारी २०२६ पर्यंत पुन्हा सुरू करण्यात आले आहे.

राज्यातील सर्व संबंधित शाळांनी पात्र विद्यार्थ्यांचे नूतनीकरण अर्ज एनएसपी २.० पोर्टलवर २२ जानेवारीपूर्वी ऑनलाईन सादर करून घ्यावेत. त्याचप्रमाणे सर्व अर्जांची प्रथम स्तर आणि द्वितीय स्तर पडताळणी २२ जानेवारीपर्यंत पूर्ण करावी. कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नसल्याने सर्व प्रक्रिया तातडीने पूर्ण करुन पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ वेळेत मिळेल, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन शिक्षण संचालक (योजना) कृष्णकुमार पाटील यांनी केले आहे.

## भाजप विचारधारेच्या उगमस्थानीच मराठी; आमची मराठीची व्याख्या अनेकवचनी आणि व्यापक : रवींद्र चव्हाण

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** भाजपाचे 'म राठी' हे केवळ भाषेपुरते मर्यादित नसून ते मराठी भाषा, संस्कृती आणि अस्मितेचा व्यापक आणि सकारात्मक विचार मांडणारे आहे, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले. भाजपाचे मराठी म्हणजे म राठी व्याकरणातील अनेकवचनासारखे असून, 'आम्ही आपले आपण' असा समावेशक दृष्टिकोन त्यामागे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विरोधकांवर कडाडून टीका करताना रवींद्र चव्हाण म्हणाले की, मराठी भाषेवर राजकारण करणे थांबवा. हा विषय विषामृतासारखा असून, त्यातून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न होऊ नये. विरोधकांची मराठी भाषेबाबतची भूमिका नकारात्मकतेने भरलेली असून, ती संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ''विश्वात्मके देवे'' या वैश्विक तत्त्वाशी विसंगत असल्याचे त्यांनी नमूद केले.

भाजपा आणि मराठी माणूस या दोन वेगळ्या गोष्टी नाहीत, असे स्पष्ट करताना रवींद्र चव्हाण म्हणाले की, मराठी माणसाने स्थापन केलेल्या मातृसंस्थेची विचारधारा हीच भाजपाची विचारधारा आहे. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंर्त्यवीर सावरकर आणि बाळासाहेब ठाकरे या तीनही मराठी भाषिक थोर व्यक्तींच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन देश आणि समाज घडवण्याचे कार्य भाजपा वर्षानुवर्षे करत आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर जगभरात राहणाऱ्या मराठी भाषिकांच्या उन्नतीसाठी भाजपा कटिबद्ध आहे. राज्याची प्रगती, नागरिकांचे जीवन अधिक सुसह्य व्हावे, देशभक्त आणि संस्कारित पिढी निर्माण व्हावी यासाठी सर्वांनी एकत्र प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

भाजपाने मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून दिला असून, जगभर साजरी होणारी गुढी पाडवा शोभायात्रा ही संकल्पनाही प्रथम भाजपाच्या कार्यकर्त्यांकडूनच सुरू झाली, याकडे रवींद्र चव्हाण यांनी लक्ष वेधले. हेच भाजपाच्या मराठी विचारांचे अनेकवचन असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

## जिल्हा नियोजन अधिकाऱ्याच्या बदली नाट्यावर अखेर पडदा ; वादग्रस्त पाचखेडेची न्यायालयात माघार, प्रसाद घाडगे रुजू

**गडचिरोली/प्रतिनिधी :** प्रशासकीय शिस्त आणि राजकीय इच्छाशक्ती यांच्यातील संघर्षाने गेल्या दोन महिन्यांपासून गडचिरोलीचे जिल्हा नियोजन कार्यालय गाजले होते. अखेर, लाचखोरीचे आरोप असलेले आणि बदलीच्या आदेशाला थेट न्यायालयात आव्हान देणारे जिल्हा नियोजन अधिकारी श्रीराम पाचखेडे यांनी माघार घेतली आहे. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणातील (मॅट) याचिका पाचखेडे यांनी मागे घेतल्याने या वादावर पडदा पडला असून, नवे जिल्हा नियोजन अधिकारी म्हणून प्रसाद घाडगे यांनी १४ जानेवारी रोजी आपला पदभार स्वीकारला.

गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त आणि आदिवासीबहुल जिल्ह्यात विकास निधीचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे असते. मात्र, श्रीराम पाचखेडे यांच्या कार्यपद्धतीमुळे जिल्ह्यातील सत्ताधारी आणि लोकप्रतिनिधींमध्ये मोठा असंतोष होता. सहपालकमंत्री आशिष जयस्वाल, आमदार डॉ. मिलिंद नरोटे आणि माजी राज्यमंत्री अम्ब्रीशराव आत्राम यांनी पाचखेडेंच्या भूमिकेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यांच्या तक्रारीची दखल घेत मुख्यमंत्री आणि मुख्य सचिवांनी २१ नोव्हेंबर रोजी पाचखेडेंची तडकाफडकी गच्छंती केली होती.

## उमेदवारांच्या बिनविरोध निवडी विरोधातील अविनाश जाधवांची याचिका हायकोर्टाने फेटाळली

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारांच्या बिनविरोध निवडीविरोधात मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी दाखल केलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. उमेदवार बिनविरोध निवडून आला असेल तरीही मतदारांसाठी नोटाचा पर्याय असावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने याचिकाकर्त्यांना खडे बोल सुनावत ही याचिका फेटाळून लावली. तुम्ही न्यायालयात सकाळी चुकीची विधानं केली. रिट पिटिशन आणि आधीच्या याचिकेत सार्धम्य असल्याचे सांगितले. मात्र, यामध्ये काहीही साम्य आढळून आलेले नाही. त्यामुळे आम्ही याचिकाकर्त्यांना दंड ठोठावत असल्याचे सुरुवातीला न्यायमूर्तींनी सांगितले.

आज सकाळी ही याचिका इतर प्रलंबित याचिकांसारखीच असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र, सुनावणीसाठी याचिका पुकारण्यात आल्यानंतर ऑनलाईन उपस्थित असलेले असीम सरोदे यांनी सांगितले की ही याचिका तत्सम नसून निवडणुकीशी संबंधित आहे. यामुळे मुख्य न्यायाधीश श्री. चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम ए. अंखड यांच्या खंडपीठाने नाराजी व्यक्त केली.

खंडपीठाने म्हटले, ही याचिका इतर याचिकांसारखीच असल्याचे चुकीचे विधान केल्याबद्दल आम्ही तुमच्यावर दंड लावणार आहोत आणि याचिका फेटाळणार आहोत, असे हायकोर्टाकडून सांगण्यात आले होते. आता सांगा, तुम्ही चुकीचे विधान का केले? एखाद्या पक्षकारासाठी अशी चुकीची माहिती देण्यामागे तुमची घाई किंवा भीती काय होती?, असा सवालही न्यायालयाने याचिकाकर्त्यांना विचारला. शेवटी न्यायालयाने दंड न आकारता ही याचिका फेटाळून लावली.

राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये मतदान होण्यापूर्वीच ६६ उमेदवार विजयी झाले आहेत. निवडणुका बिनविरोध करण्यात भाजपाने आघाडी घेतली अजून आतापर्यत भाजपाचे ४४ उमेदवार बिनविरोध विजयी झालेत. त्यापाठोपाठ निवडणुका बिनविरोध करण्यात शिंदेंच्या शिवसेनेने दुसरा क्रमांक पटकावला आहे. शिंदेंच्या शिवसेनेते तब्बल १९ नगरसेवक बिनविरोध विजयी झालेत. कल्याण-डोंबिवलीत भाजपचे सर्वाधिक १४ उमेदवार तर शिवसेनेचे ६ उमेदवार बिनविरोध विजयी झालेत. त्यानंतर अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे २ तर मालेगावमधून इस्लाम पार्टीच्या एक उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत.

# कुत्रा चावल्यामुळे कोणाचा मृत्यू झाल्यास मोठी भरपाई द्यावी लागेल

## सर्वोच्च न्यायालयाचा सरकारला इशारा

नवी दिल्ली-भटक्या कुत्र्यांवरील स्वयंयाचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयानं महत्त्वाची टिप्पणी केली. कुत्र्यांमुळे लहान मुले, वृद्ध अथवा शारीरिक दुर्बल व्यक्तीचा मृत्यू झाल्यास अथवा ते जखमी झाल्यास राज्य सरकारला मोठी नुकसानभरपाई द्यावी लागेल, असे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठानं म्हटलं.

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठानं म्हटलं की, गेल्या ७५ वर्षांमध्ये सरकारनं भटक्या कुत्र्यांची समस्या सोडविण्यासाठी काहीही केलं नाही. या निष्काळजीपणासाठी राज्य सरकारांना जबाबदार धरलं पाहिजे. पशू कल्याण संघटनेचे वरिष्ठ वकील मेनका गुरुस्वामी यांनी म्हटलं, तुम्ही तसेच केलं पाहिजे. त्यावर न्यायाधीशांनी म्हटलं, जे लोक कुत्र्यांना खाऊ घालत असल्याचा दावा करतात, त्यांनाही जबाबदार धरलं पाहिजे. त्यांचीदेखील जबाबदारी आहे. त्यांनी कुत्र्यांना घरी किंवा परिसरात ठेवायला पाहिजे.

कुत्रा चावल्यामुळे त्याचा आयुष्यभर परिणाम होतो. कुत्रा चावल्याच्या घटनेला आपणदेखील बळी पडलो होतो, असे वकील गुरुस्वामी यांनी सांगितलं. त्यावर न्यायाधीश मेहता यांनी भावना आणि चिंता केवळ कुत्र्यांसाठी असतात असे म्हटलं. त्यावर वकील गुरुस्वामी यांनी माणसांसाठीदेखील तेवढीच चिंता असल्याचं स्पष्ट केलं. नियामक संस्था अपयश ठरत आहे. योग्य मानवी वागणूक आणि कुत्र्यांचं निर्बिजीकरण अधिक प्रभावी ठरेल, असेही त्यांनी म्हटलं. नियामक आणि केंद्र सरकार निधीचा कमी वापर करत



आहेत. एबीसी नियम हे केवळ कुत्र्यांची संख्या नियंत्रणासाठी नाहीत.

सर्वोच्च न्यायालयानं तोंडी विचारलं की, श्वानप्रेमी संघटनांकडून खायला घातलेल्या भटक्या कुत्र्यांनी नऊ वर्षांच्या मुलाला त्रास दिला तर कोणाला जबाबदार धरावे? या न्यायालयानं डोळे बंद करून गोष्टी घडू द्याव्यात का? प्राण्यांमुळे माणसांना होणाऱ्या वेदनांबद्दल काय? जर प्राण्यांनी माणसांवर हल्ला केला तर कोण जबाबदार असेल? न्यायालयानं निरीक्षण नोंदवलं की, भटक्या कुत्र्यांमध्ये विशिष्ट विषाणू असू शकतात. जेव्हा अशा कुत्र्यांवर वाघांसारखे वन्य प्राणी हल्ला करून त्यांना खातात, तेव्हा ते कॅनाइन डिस्टेंपरसारखे रोग पसरवू शकतात. संक्रमित प्राण्यांचा मृत्यू होऊ शकतो.

ज्येष्ठ वकील विकास सिंह यांनी युक्तिवाद केला की, या समस्येकडे कुत्रा विरुद्ध माणूस असा वाद म्हणून पाहू नये. तर अधिक व्यापकपणे प्राणी विरुद्ध माणूस संघर्ष म्हणून पाहिलं पाहिजे. त्यांनी निदर्शनास आणून दिलं की, दरवर्षी सुमारे ५०,००० लोकांचा साप चावल्यानं मृत्यू होतो. माकडांच्या हल्ल्याच्या घटनाही नोंदवल्या

## शरद पवार गटात गोंधळ! अधिकृत उमेदवार सोडून स्थानिकांचा ठाकरेंच्या उमेदवाराला पाठिंबा

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण डोंबिवली महापालिकेच्या निवडणुकांच्या मतदानाला अवघे काही तास उरलेत मात्र अद्यापही राष्ट्रवादी शरद पवार गटातला गोंधळ काही संपला नसल्याचे समोर आले आहे. पॅनल क्रमांक चार ड मध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून रामदास वळसे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. गेल्या नऊ दिवसांपासून त्यांचा प्रचार देखील सुरू होता. मात्र, काल दुपारच्या सुमारास अचानक सोशल मीडियावर राष्ट्रवादीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीचा पाठिंबा उबाठाच्या उमेदवाराला असल्याचे पत्र काढले आहे. हे पत्र सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहे. दरम्यान, मतदानाला काही तास उरलेले असताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार मात्र गोंधळलेले असलेले पाहायला मिळाले. याबाबत वळसे यांनी सांगितले की मला राष्ट्रवादी शरद पवार गटाने अधिकृत उमेदवारी दिली आहे. मात्र, स्थानिक पदाधिकाऱ्यांनी माझ्या पाठीत खंजीर खुपसला आहे. वरिष्ठ नेत्यांना मला कोणालाही विश्वासात न घेता पक्षाचा अधिकृत उमेदवार असताना देखील माझ्या विरोधात असलेल्या उबाठाच्या उमेदवाराला पाठिंबा दिला आहे.



## मराठी माणूस अन् सेनेची दुटप्पी भूमिका

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत उबाठा सेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नेत्यांना 'मराठी माणसाचा हक्क' हे एकमेव तुणतुणे २५ वर्षांनंतरही वाजवावे लागते, हाच या पक्षांनी मराठी माणसासाठी काहीही केले नाही, त्याचा ज्वलंत पुरावा. राज ठाकरे यांनी जवळपास २० वर्षांनंतर उद्धव ठाकरे यांच्या गटाबरोबर हातमिळवणी केली आणि हे दोन्ही पक्ष मराठी माणसाच्या कथित हक्कांसाठी एकत्र आल्याचा दावा करत आहेत. त्यांच्या या कृतीतूनच त्यांचा निव्वळ संधीसाधूपणा उघड होतो. पूव एकत्र असताना तरी त्यांनी मराठी माणसासाठी काय केले? तर नागरिकांच्या दैनंदिन आयुष्यातील प्रश्न, जसे की पाणीपुरवठा, नालेसफाई, दळणवळण यांसारख्या पायाभूत सुविधांकडे दुर्लक्षच केले. पालिकेच्या कामांमध्येही अमराठी कंत्राटदारांना हाताशी धरून, कोट्यवधींचा प्रचंड भ्रष्टाचारच केला. मुंबई महापालिकेला सोन्याचे अंडे देणारी कोंबडी समजून, आताही हा मलिदा खाण्यासाठीच ठाकरे बंधूंना मुंबईत सत्ता हवी आहे. पण, याच ठाकरे बंधूंना मराठी माणसाचा हक्क लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महत्त्वाचा वाटला नव्हता का? असाच प्रश्न उपस्थित होतो. मुळात, मराठी अस्मिता कशात आहे, तर मुख्यत्वे भाषा, संस्कृती आणि राजकारण. पण, या फक्त तीन क्षेत्रांचा जरी विचार केला, तरी त्यात ठाकरे बंधूंचे ठोस योगदान कोणते, हे शोधणे अवघडच. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी. पण, ती देशाचीही आर्थिक राजधानी आहे. स्वाभाविकच, देशाच्या सर्व भागांतून येथे लोक नोकरी-धंद्यानिमित्त दाखल होतात. त्यामुळे 'या शहरात बाहेरून कुणाला आम्ही येऊच देणार नाही, इथे केवळ मराठीतच बोलण्याची सक्ती' अशा भूमिका या अव्यवहार्यच. असे असले तरी, मुंबई हे मराठी माणसाचे शहर आहे हे जाणवण्यासाठी, उद्धव ठाकरेंनी पालिकेत २५ वर्षे, मुख्यमंत्री म्हणून राज्यात अडीच वर्षे सत्ता असताना काहीच केले नाही. मुंबईत परराज्यातील बेसुमार आवक ठाकरेंनीच होऊ दिली. त्यांच्यासाठी बेकायदा झोपड्या उभारल्या आणि मतांसाठी त्या यथावकाश कायदेशीरही केल्या. या झोपड्यांमध्ये पूर्णपणे अमराठी लोकांचीच वस्ती आहे. त्यांच्याच मतांवर या दोन पक्षांचे नेते निवडून येण्याची अपेक्षा बाळगतात, यापेक्षा त्यांनी केलेली मराठीची अवहेलना ती कोणती? त्यातच मराठी संस्कृतीची ओळख दृश्यमान करणारी दोन क्षेत्रे, म्हणजे मराठी चित्रपट आणि रंगभूमी. मराठी संस्कृतीची ही दोन्ही दृश्य अंगे आज निपचित पडलेली आहेत. अनेक मराठी चित्रपटांच्या कथा-संकल्पना व अभिनय हे हिंदी गल्लाभरू आणि व्यावसायिक चित्रपटांपेक्षा खूपच दर्जेदार असतात. पण, निर्मितीमूल्ये, प्रसिद्धी, वितरणव्यवस्था यांत ते मार खातात. त्यांना शहरातील प्रमुख चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शनासाठी मोक्याच्या वेळा मिळत नाहीत. मुंबईत हिंदी चित्रपटसृष्टीही वसलेली. मग हिंदी चित्रपटांच्या तुलनेत, मराठी चित्रपटांची स्थिती सुधारण्यासाठी ठाकरेंनी आजवर अशी कोणती उल्लेखनीय कामगिरी केली? मराठी चित्रपटनिर्मितीसाठी केवळ तुटपुंजे अनुदान दिले, म्हणजे त्यांची जबाबदारी संपली का? देशात हिंदी, इंग्रजी, गुजराती रंगभूमीपेक्षाही अधिक दर्जेदार आणि सशक्त अशी मराठी रंगभूमी. मराठी रंगभूमीला १०० वर्षांपेक्षा अधिकचा गौरवशाली इतिहास आहे पण, आज मुंबईत चार-पाच नाट्यगृहे सोडली, तर मराठी नाटकांना वालीच नाही, अशी स्थिती. मराठी नाट्यसृष्टी आजही सशक्त असली, तरी तिला भौतिक पायाभूत सुविधांची उणीव जाणवते. मराठी संगीत रंगभूमीचा गौरवशाली वारसा पुनरुज्जीवित करणाऱ्या नाट्यकमचीही तीव्र उणीव जाणवत आहे. मग अशातच मराठी संस्कृती आणि अस्मितेसाठी लढण्याचा दावा करणाऱ्या उबाठा सेना व मनसे यांचे त्यात योगदान किती होते? तर शून्यच! मराठी संस्कृतीचे खरे दर्शन घडविणाऱ्या रंगभूमीला मोठी आर्थिक मदत आणि संस्थात्मक स्वरूप मिळण्याची गरज आहे. पण, महापालिकेच्या कंत्राटांतील टक्का अमराठी कंत्राटदारांकडून वसूल करण्यातून त्यांना फुरसत आहे का? मात्र, महायुती आता ते काम करणार आहे. आधीच केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्रदान केला आहे. एवढेच नाही, तर मागेच 'युनेस्को'ने छत्रपती शिवाजी महाराजांचा जिवंत वारसा असलेल्या, १२ गड-किल्ल्यांनाही जागतिक वारसास्थळांच्या यादीत स्थान देऊन गौरविले आहे. शिवाय, महायुतीच्या वचननाम्यानुसार, मुंबईच्या प्रत्येक विभागात मराठी नाटक, लोककला आणि साहित्यासाठी सुसज्ज मराठी कला केंद्र आणि अभ्यासिकेची उभारणी केली जाणार आहे. तसेच, फक्त मराठी चित्रपटांसाठी मराठी मल्टिप्लेक्स उभारले जातील, अशी घोषणाही वचननाम्यांतून करण्यात आली आहे. याउलट, ठाकरे बंधूंच्या जाहीरनाम्यात 'मराठी अस्मिते'च्या मुद्द्यावर ठोस अशी कोणतीही आश्वासने जनतेला दिलेली दिसत नाहीत. हाच ठाकरे आणि फडणवीसांच्या कार्यशैलीतील मोठा फरक. दुसरे असे की, भाजप हा काही मंगळ ग्रहावरील पक्ष नव्हे. त्याचे नेतेही मराठीच आहेत. फक्त ठाकरे म्हणजे मराठी नाही, ही गोष्ट आता मराठी माणसाला उमगू लागली आहे. महायुतीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील मराठी माणसाला त्याचे हक्काचे घर मिळवून देण्याचा निश्चय केला असून, त्याचा प्रारंभ बीडीडी चाळींच्या विकासाद्वारे सुरू झाला आहे. वरळीतील या चाळींच्या पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरू झाले असून, तिथे मराठी माणसाला हक्काचे घर मिळाले आहे. त्यामुळे फडणवीसांना जितकी मुंबईच्या प्रश्नांची जाण आणि कळकळ असल्याचे दिसते, त्याच्या एक दशांशानेही ठाकरे बंधूंकडे ती आढळत नाही. म्हणूनच ते मराठी माणसांसाठी आजवर सत्तेत असताना आणि नसतानाही कधीही काही ठोस करू शकले नाहीत. दादरमधील 'कोहिनूर मिल'च्या जागेवर राज ठाकरेंनी टोलेजंग टॉवर उभा केला; पण त्याच गिरण्यांमधील मराठी माणूस घरापासून वंचितच राहिला. तब्बल २५ वर्षे मुंबईवर एकहाती सत्ता असताना ठाकरेंना आजही मराठी माणसाच्या हक्कासाठी संघर्ष करावा लागतो, ही या पक्षांची राजकीय हार आणि शोकांतिकाच म्हणावी लागेल. मुंबईत मराठी माणसाच्या हक्कांसाठी जन्मलेल्या शिवसेनेने राज्यसभेवर नेहमीच अमराठी नेत्यांना पाठविले. 'उत्तर भारतीय सेने'ची स्थापनाही मग कुणी आणि कशासाठी केली? हिंदी भाषा इतकीच नकोशी वाटते, तर 'दोपहर का सामना' कशासाठी सुरू केला? याची उत्तरेही ठाकरेंनी द्यावी. अमराठी लोक पटतच नाहीत, तर मग गुजराती उद्योजकांच्या घरी उंची पार्ट्या झोडणे असेल काय, अथवा उद्धव ठाकरेंच्या सुपुत्राने त्या उद्योजकपुत्राच्या लग्नात ठेका धरलेला तरी यांना कसा चालतो? म्हणजे यांनी आपले सर्व भाषिकांशी संबंध उत्तम जपायचे, पण सामान्य मराठी माणसाने मात्र रस्त्यावर उतरून मराठीसाठी भांडतच राहायचे, केसेस अंगावर घ्यायच्या अशीच यांची इच्छा. म्हणजेच काय, तर सामान्यांना ही अस्मितेची धुंद इतकी चढवायची की आपसूकच विकास, नागरी समस्या यांवर त्यांनी प्रश्न विचारताच कामा नये. अशा या दुटप्पी उबाठाला मविआच्या काळात 'उर्दू भवन' बांधण्याची गरज जाणवली; पण 'वारकरी भवन' बांधणे काही महत्त्वाचे वाटले नाही. अजान स्पर्धा भरविल्या, पण कीर्तन स्पर्धा काही आयोजित कराव्याशा वाटल्या नाहीत. असो! एकूणच मराठी माणसाचा हक्क जपणे, म्हणजे नेमके कोणते कार्य या दोन पक्षांनी केले, ते त्यांच्या नेत्यांनाही सांगता येणार नाही. मराठी माणसाच्या नावे या दोन पक्षांनी केवळ आणि केवळ राजकारणच केले आणि त्याचा लाभ घेतला. याचा विचार करूनच मराठी माणसाने १५ तारखेला मतदान केले पाहिजे.

## जपानच्या होक्काईडो प्रांताचे उपराज्यपाल कानो ताकायुकी यांनी घेतली

# कौशल्य मंत्री मंगलप्रभात लोढा यांची सदिच्छा भेट

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील कौशल्य प्रशिक्षित तरुणांना जपानमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध होणार असून येत्या तीन महिन्यात याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली. जपानच्या होक्काईडो प्रांताचे उपराज्यपाल कानो ताकायुकी यांनी मंत्रालयात कौशल्य मंत्री लोढा यांची शिष्टमंडळासह भेट घेतली.

यावेळी कौशल्य प्रशिक्षित मनुष्यबळाची जपानमध्ये मोठी मागणी असल्याच्या पार्श्वभूमीवर रोजगाराच्या संधीबाबत चर्चा करण्यात आली. कौशल्य विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख, जपानच्या आंतरराष्ट्रीय व्यवहार विभागाचे वरिष्ठ संचालक तोशिनोरी नाईतो, परदेशी मनुष्यबळ विभागाचे संचालक ईजी यामामोटो तसेच आंतरराष्ट्रीय व्यवसाय विभागाचे संचालक माकोतो ताकाहाशी, आंतरराष्ट्रीय व्यवसाय विनिमय विभागाच्या प्रमुख हिरोए मिकामी उपस्थित होते. या बैठकीदरम्यान भाषांतराची जबाबदारी दुभाषी युका इगाराशी यांनी पार पाडली.

होक्काईडो हा जपानच्या उत्तरेकडील प्रांत असून, जपानचा जवळपास २२ टक्के भाग या प्रांताने व्यापला आहे. या प्रांतात कृषी, मत्स्य, उद्योग, बांधकाम आणि पायाभूत सुविधा तसेच नर्सिंग क्षेत्रात मनुष्यबळाची नितांत गरज आहे. त्यानुसार कुशल मनुष्यबळाच्या उपलब्धतेसाठी होक्काईडो प्रांताने आंतरराष्ट्रीय भागीदारीसाठी पुढाकार घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून या प्रांताच्या शिष्टमंडळाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री लोढा यांची भेट घेतली.

कौशल्य मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, जागतिक स्तरावर भारतीय मनुष्यबळ क्रियाशील ठेवण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा कौशल्य विकासावर अधिक भर आहे. त्यादृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यातील कौशल्य विभाग कार्यरत असून विविध देशांमध्ये राज्यातील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने काम सुरु आहे. विद्याविहार येथील स्वामी विवेकानंद कौशल्य विकास प्रबोधनीद्वारे



कौशल्य प्रशिक्षण आणि जपानी भाषेचे शिक्षण देण्याचा प्रयत्न असल्याचेही कौशल्य मंत्री लोढा यांनी सागितले.

जपानमध्ये कृषी, वैद्यकीय, विविध तंत्रज्ञ, बांधकाम आणि सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी आहे. भारतीय युवक अधिक कार्यक्षमतेने काम करत असून भारतीय कौशल्य प्रशिक्षित तरुणांना जगभरात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे होक्काईडो प्रांताचे उपराज्यपाल कानो ताकायुकी यांनी सांगितले.

पान १ वरून...

# राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी महासंग्राम

मतदारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठीच्या एकूण ३९ हजार ९२ मतदान केंद्रांपैकी एकूण ३ हजार १९६ संवेदनशील मतदान केंद्र घोषित करण्यात आली आहेत.

महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ४३ हजार ९५८ कंट्रोल युनिट आणि ८७ हजार ९१६ बॅलेट युनिटची उपलब्धता केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी ११ हजार ३४९ कंट्रोल युनिट आणि २२ हजार ६९८ बॅलेट युनिटची व्यवस्था केली आहे.

बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व २८ महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेत एका प्रभागातून एकच सदस्य निवडून द्यावयाचा असल्याने प्रत्येक मतदाराला केवळ एकच मत द्यावे लागेल. उर्वरित सर्व २८ महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे प्रत्येक प्रभागात साधारणत: चार जागा असतील. काही महानगरपालिकांच्या काही प्रभागांत तीन अथवा पाच जागा असू शकतील. त्यानुसार बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक मतदाराने साधारणत: ४ मते देणे अपेक्षित आहे. काही ठिकाणी ३ ते ५ मते देणे अपेक्षित असेल. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे २२७ प्रभाग असून यांसह सर्व महानगरपालिका मिळून ८९३ प्रभाग आहेत. त्यात एकूण २ हजार ८६९ जागांचा समावेश आहे. त्यासाठी एकूण १५ हजार ९०८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ३ अपर पोलिस अधीक्षक, ६३ पोलीस उप अधीक्षक, ५६ पोलीस निरीक्षक, ८५८ सहायक पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक आणि ११ हजार ९३८ पोलीस अंमलदारांचा समावेश आहे. त्याचबरोबर एकूण ४२ हजार ७०३ होमगार्ड देखील तैनात करण्यात आले आहेत. मतमोजणी आणि कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्तासाठी राज्य राखीव पोलीस दलाच्या एकूण ५७ कंपन्या तैनात करण्यात आल्या आहेत.

महानगरपालिका निवडणुकांसाठीचे मतदान आणि मतमोजणीची तयारी; तसेच १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गच्या १२५ पंचायत समितींच्या निवडणुकांची तयारी याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली आज (ता. १४) बैठक घेण्यात आली. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मतदान, मतमोजणी; तसेच कायदा व सुव्यवस्था याबाबत उपस्थित प्रतिनिधींना अवगत करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे महानेल, ''महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये मोठ्या संख्येने मतदान करून आपणही आपल्या शहराच्या-महानगराच्या जडणघडणीत योगदान द्यावे आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा. आपलं मत आपल्या शहराचं भवितव्य ठरवू शकतं. कारण ते अनमोल आहे. लोकशाहीतला तो आपला महत्वाचा हक्क आहे आणि तो आपण मतदानाच्या माध्यमातून बजवायला हवा, त्यासाठी आपण नक्की मतदान करावे, असे मी सर्व मतदारांना आव्हान करतो.''

राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली आज (ता. १४) मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# जंगल सफारीत चित्त्याला घाबरून मौनी पळाली

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलीवूड अभिनेत्री मौनी रॉय हिच्यासोबत अलीकडेच एक मोठा अनर्थ घडता-घडता टळला. जंगलात ट्रेकिंगसाठी गेलेल्या मौनीला अचानक जंगली प्राण्याची गर्जना ऐकू आली आणि चित्ता किंवा बिबट्याचा हा आवाज ऐकून मौनी आणि तिच्या सहकार्यांना जीव वाचवण्यासाठी तत्काळ तिथून पळ काढावा लागला.

हा संपूर्ण अनुभव मौनीने स्वतः इन्स्टाग्रामवर शेअर केला असून, ट्रेकदरम्यानचे काही फोटोही तिने पोस्ट केले आहेत. मौनीने लिहिले आहे की, आज जंगलात ट्रेकिंगला गेलो होतो. चढ-उतार केले, धबधब्यांमधून चाललो आणि अचानक बिबट्या/चित्त्याची दहाड ऐकू आली. मग काय जीव वाचवून पळावं लागलं. सगळ्यांना सुट्ट्यांच्या शुभेच्छा!

मौनीने शेअर केलेल्या फोटोंमध्ये ती चित्ता प्रिंट पँट आणि स्वेटर घालून कॅज्युअल लूकमध्ये दिसत आहे. काही फोटोंमध्ये ती जंगलाच्या मध्यभागी बसून निसर्गाचा आनंद घेताना दिसते. कामाबाबतीत बोलायचं झालं, तर मौनी लवकरच एका ओटीटी थ्रिलर सीरिजमध्ये झळकणार आहे. त्यात तिच्यासोबत निमृत कौर अहलूवालिया आणि शाहीर शेख दिसणार आहेत. याशिवाय ती 'है जवानी तो इश्क होना है' या रोमँटिक कॉमेडी चित्रपटातही दिसणार आहे. मधुर भंडारकर यांच्या 'द वाइव्हस' मध्येही ती आहे.

# शीख बांधवांची अखंड लंगर सेवा







निस्वार्थ सेवा आणि एकाच देवाची उपासना सामाजिक सेवेत समुदायाचा सहभाग या सुत्रांनी समाज उभारणी करून श्री गुरू नानक देव यांनी शीख धर्माची स्थापना केली. धर्म पुढे नेताना मुगल सम्राट औरंगजेब याचा काळ आला त्यावेळी धर्माची धुरा श्री गुरू तेग बहादूर साहेब यांच्याकडे आलेली होती.

कश्मीरी पंडितांनी त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायावर तोडगा काढावा यासाठी बलिदान देण्याची तयारी श्री गुरू तेग बहादूर यांनी दाखवली व त्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले. त्यामुळे मुगल सैन्याचा त्रास कमी झाला. त्यामुळे श्री गुरू तेग बहादूर यांना हिंद दी चादर म्हंटले जाते.

आपला धर्म सर्वसमावेशक अर्थात समाजातील सर्व घटकांना सामावणारा बनविण्याचे मोठे काम त्यांनी आपल्या कार्यकाळात केले. त्यांनी इ.स.१६२१ ला जन्म झालेल्या श्री गुरू तेग बहादूर यांनी १६७५ साली सर्वोच्च बलिदान दिले.

त्यांच्या बलिदानानंतर त्यांचे पुत्र श्री गुरू गोविंदसिंह हे दक्षिणेत आले आणि नांदेड येथे अखेरपर्यंत निवास केला. कोणतीही व्यक्ती यापुढे गुरूपदी येणार नाही तर श्री गुरू ग्रंथ साहिब हे यापुढे गुरू असे जाहिर केले. त्यानंतर एक ईश्वर अर्थात ओंकार आणि गुरू ग्रंथ साहेब याचीच पूजा शीख धर्मात होते.

श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागमाचा मोठा कार्यक्रम या निमित्ताने नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ या काळात होणार आहे. याच्या आयोजनात महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतला आहे.

शीख समाजाची उभारणी सामुदायिक आणि निस्वार्थ सेवा कार्यावर आधारित आहे. यामध्ये लंगर सेवा, गुरूद्वारा सेवा, शिक्षण व युवा विकास तसेच आपत्तीच्या काळात मदत यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

लंगर सेवा खऱ्या अर्थाने वेगळ्या प्रकारची सेवा आहे. एकता, समानता योच दर्शन आपण होईल प्रत्येक व्यक्ती स्वयंसेवक होवून जेवण बनविण्यापासून ते सर्वांना मोफत देण्याचे काम होते. अगदी भांडी स्वच्छ करण्यासाठी स्वयंसेवक होण्यासाठीही सर्व जण पुढाकार घेतात.

अमृतसर येथील श्री हरिमंदीर अर्थात सूवर्ण मंदीर येथे २४ तास कोणताही खंड न पडू देता ही लंगर सेवा चालते. या ठिकाणी जगभरातील शीख धर्मिय तसेच इतर धर्माचेही लाखो भाविक, पर्यटक येत असतात. येथे कोणताही जात, धर्म याच्या पलिकडे जाण्यायेणाऱ्या प्रत्येकास ही लंगर सेवा उपलब्ध आहे.

गुरूद्वारा हुजूर साहिब अर्थात नांदेड येथे गुरूद्वारा ते सुवर्ण मंदीर अशी थेट रेल्वे सेवा सुरू झालेली आहे. ही रेल्वे नांदेड स्थानकातून निघण्यापूर्वी रेल्वेतील प्रत्येक प्रवाशाला लंगर प्रसाद शीख बांधव पूरवित आहे. या रेल्वेच्या मार्गावर थेट अमृतसर पर्यंत दुपारचे तसेच रात्रीचे जेवण या स्वरूपात लंगर प्रसाद दिला जातो. असे असणारी ही भारतातील एकमेव रेल्वे आहे.

श्री गुरू तेग बहादूर यांचा ३५० वा शहिदी समारंभ याच नांदेड नगरीत होणार आहे हे इथे विशेष.

**– प्रशांत दैठणकर**
**९८२३१९९४६०**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महिला लोकशाही दिनाचे १९ जानेवारी रोजी आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांच्या वतीने महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार महिला लोकशाही दिन सोमवार, १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे आयोजित करण्यात येणार आहे, असे मुंबई शहरच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे. या उपक्रमांतर्गत पीडित महिलांना त्यांच्या तक्रारी व अर्ज सादर करण्यासाठी जिल्हा पातळीवर सुलभ व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, २१५ बी.बी.डी. चाळ, पहिला मजला, वरळी, मुंबई ४०००२५ येथे तक्रार अर्जाचा नमुना उपलब्ध आहे. तक्रार दाखल करताना अर्ज निर्धारित नमुन्यात भरावा. तक्रारी वैयक्तिक स्वरूपाच्या असाव्यात. तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणे, अपूर्ण अर्ज, धर्म व राजकारण विषयक बाबी अथवा वैयक्तिक स्वरूप नसलेल्या तक्रारी स्वीकारल्या जाणार नाहीत, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## सबरीमाला मंदिरात तूप विक्रीत लाखो रुपयांचा महाघोटाळा! केरळ उच्च न्यायालयाचे कठोर पाऊल

तिरुअनंतपुरम : केरळमधील जगप्रसिद्ध सबरीमला मंदिरात सोन्याच्या दरोड्यानंतर आता 'तूप घोटाळा' समोर आल्याने खळबळ उडाली आहे. भगवान अय्यप्पांच्या दर्शनासाठी येणाऱ्या कोट्यवधी भाविकांकडून अर्पण केल्या जाणाऱ्या तुपाच्या विक्रीत लाखो रुपयांचा अपहार झाल्याचे उघड झाले असून, केरळ उच्च न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. न्यायालयाने राज्य दक्षता आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला या प्रकरणाच्या तळाशी जाऊन एका महिन्याच्या आत चौकशी अहवाल सादर करण्याचे कडक निर्देश दिले आहेत.

हा घोटाळा नोव्हेंबर आणि डिसेंबर २०२५ च्या दरम्यान घडल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. मंदिराच्या दक्षता अधिकाऱ्यांनी केलेल्या अंतर्गत लेखापरीक्षणात पैशांची मोठी तफावत दिसून आली. या प्रकरणी त्रावणकोर देवस्वम बोर्डाचे काउंटर इन्चार्ज सुनील पोटी यांना तातडीने निलंबित करण्यात आले आहे. भाविकांना दिल्या जाणाऱ्या 'आथिया षष्ठम' प्रसादासाठी वापरल्या जाणाऱ्या तुपाच्या हिशेबात ही गडबड झाली आहे.

असे आहे घोटाळ्याचे गणित

सबरीमाला मंदिरात भाविक नारळ आणि तूप अर्पण करतात, ज्याची पुनर्विक्री बोर्डाद्वारे १०० मिलीच्या पॅकेटमध्ये केली जाते. प्रत्येक पॅकेटची किंमत १०० रुपये निश्चित आहे.

विक्रीसाठी आलेली पाकिटे : १७ नोव्हेंबर ते २६ डिसेंबर २०२५ दरम्यान ३,५२,०५० पाकिटे पॅक केली गेली. विक्रीची नोंद : मराठमठ इमारतीतील काउंटरवरून ८९,३०० पाकिटांची विक्री झाल्याचे दाखवण्यात आले. रुपयांचा हिशेब : नियमानुसार ८९,१२९ पाकिटांचे पैसे जमा व्हायला हवे होते. मात्र, कर्मचाऱ्यांनी केवळ ७५,४५० पाकिटांचीच रक्कम जमा केली.

अपहार : तब्बल १३,६७९ पाकिटांचे पैसे, म्हणजेच अंदाजे १३ लाख ६७ हजार ९०० रुपये तिजोरीत जमा झालेच नाहीत.

उच्च न्यायालयाने या प्रकरणावर भाष्य करताना म्हटले की, ''इतक्या कमी कालावधीत झालेली ही तफावत केवळ हिशेबातील चूक असू शकत नाही. यामागे मोठे षडयंत्र असण्याची शक्यता नाकारता येत नाही.'' कंत्राटदाराला पाकीट बनवण्यासाठी मिळणारे २० पैसे आणि बोर्डाचे साहित्य असतानाही झालेला हा अपहार चिंताजनक आहे.

# श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त मैदानावर भव्य श्रमदान

- दोन हजार विद्यार्थ्यांचा ऐतिहासिक श्रमदानात सहभाग
- नांदेड येथील ''हिंद-दी-चादर'' कार्यक्रमात सहभागी होण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन
- २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथील असर्जन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (मोदी मैदान) येथे भव्य धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सिख धर्माच्या मर्यादा व परंपरांचे पालन करून पार पडणार आहे.

कार्यक्रमाच्या कालावधीत सदर मैदानावर गुरुद्वारा प्रतिकृती (दरबार साहिब) असणार असल्याने भाविकांना चप्पल अथवा बूट न वापरता अनवाणी प्रवेश करावा लागणार आहे. त्यामुळे भाविकांना चालताना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी आज जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत विशेष





श्रमदान उपक्रम राबविण्यात आला.

या श्रमदानात नांदेड जिल्ह्यातील सुमारे १,५०० विद्यार्थी, ॲकॅडमीचे ५०० विद्यार्थी महापालिकेचे कर्मचारी तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. श्रमदानाद्वारे मैदानावरील खडे वेचून परिसर स्वच्छ करण्यात आला.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी रामेश्वर नाईक, क्षेत्रीय धर्मजागरण समितीचे प्रमुख महेंद्रजी रायचुरा, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे, तहसीलदार आनंद देवूळगावकर, शिक्षणाधिकारी माधव सलगर, रेडक्रॉसचे हर्षद शहा, मनपा अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपशिक्षणाधिकारी रामचंद्र पांचगे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात खालसा हायस्कूल, राजर्षी पब्लिक स्कूल, नागार्जुना हायस्कूल, सचखंड पब्लिक स्कूल यांसह पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी, विविध एनजीओ, सोल्जर ॲकॅडमी, तोटेवाड फिजिकल ॲकॅडमी, नांदेड फिजिकल व गरुडा फिजिकल ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी या श्रमदानात मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

या श्रमदानातून गुरुप्रती सेवा, समर्पण व प्रेमाची अनुभूती अनुभवास मिळाली. नांदेड येथे सिख धर्मियांचे एक महत्त्वाचे तख्त असल्याने या शहीदी समागम कार्यक्रमाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या कार्यक्रमात विविध धर्म व समुदायांचे भाविक सहभागी होणार आहेत. तरी सर्वांनी नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी केले.

येणाऱ्या भाविकांना अनवाणी चालताना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी असर्जन परिसरातील मोदी मैदान पूर्णतः स्वच्छ करण्यात आले. या उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन सेवाभावातून श्रमदान केले, याबाबत विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले.

## महिला लोकशाही दिनाचे १९ जानेवारी रोजी आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांच्या वतीने महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार महिला लोकशाही दिन सोमवार, १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे आयोजित करण्यात येणार आहे, असे मुंबई शहरच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

या उपक्रमांतर्गत पीडित महिलांना त्यांच्या तक्रारी व अर्ज सादर करण्यासाठी जिल्हा पातळीवर सुलभ व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, २१५ बी.बी.डी. चाळ, पहिला मजला, वरळी, मुंबई ४०००२५ येथे तक्रार अर्जाचा नमुना उपलब्ध आहे.

तक्रार दाखल करताना अर्ज निर्धारित नमुन्यात भरावा. तक्रारी वैयक्तिक स्वरूपाच्या असाव्यात. तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणे, अपूर्ण अर्ज, धर्म व राजकारण विषयक बाबी अथवा वैयक्तिक स्वरूप नसलेल्या तक्रारी स्वीकारल्या जाणार नाहीत, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## थायलंडमध्ये धावत्या रेल्वेवर कोसळली क्रेन; रेल्वेने घेतला पेट, २२ जणांचा मृत्यू

पटाया : थायलंडमध्ये एका रेल्वेवर क्रेन कोसळल्याने आज (बुधवार) सकाळी झालेल्या अपघातात २२ जणांचा मृत्यू तर ३० हून अधिक जण जखमी झाले आहेत. थायलंड मधील सिखिओ जिल्ह्यात हा अपघात झाला. हाय स्पीड रेल्वे लाइनचे काम सुरू असताना बांधकाम क्रेन एका रेल्वेवर कोसळली.

रेल्वेच्या एका डब्यावर क्रेन कोसळल्यानंतर रेल्वे डब्याला आग लागली. त्यात २२ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. थायलंडची राजधानी बँकॉकपासून २३० किमी अंतरावर हा अपघात झाला आहे. थायलंडमधल्या नाखोन रतचासिमा प्रांतात हा अपघात झाला. थायलंडमधील सिखिओ जिल्ह्यातून रेल्वे जात असताना हा अपघात झाला आहे. थायलंडची राजधानी बँकॉकपासून २३० किमी अंतरावर ही घटना घडली आहे. घटना घडली त्या ठिकाणी हाय स्पीड रेल्वे लाईनचे काम सुरू होते. दरम्यान, रेल्वेच्या डब्यावर क्रेन कोसळल्यानंतर रेल्वे रूळावरून घसरली.या अपघातात २२ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. ३० हून अधिक प्रवासी या अपघातात जखमी झाले आहेत. घटनास्थळी मदतकार्य सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच जखमींना रूग्णालयात दाखल केले जात आहे. रेल्वे रूळावरून घसरल्यानंतर रेल्वेने पेट घेतला.

## पुणेकरांनो, मतदानासाठी सुट्टी नाकारली तर मालकाची खैर नाही! लगेचच इथे करा तक्रार

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पिंपरी-चिंचवड आणि पुणे जिल्ह्यातील सर्व मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी गुरुवारा १५ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या खासगी कंपन्या, कारखाने आणि व्यापारी प्रतिष्ठानांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा कामगार उपायुक्त कार्यालयाने दिला आहे.


भरपगारी सुटी देणे अनिवार्य: कामगार उपायुक्त निखिल वाळके यांनी स्पष्ट केलं आहे की, मतदानाच्या दिवशी केवळ शासकीय कार्यालयांनाच नव्हे, तर आयटी कंपन्या, औद्योगिक कारखाने, दुकाने, मॉल्स, हॉटेल्स आणि शॉपिंग सेंटर्समधील कर्मचाऱ्यांनाही सुटी देणे बंधनकारक आहे. ही सुटी 'भरपगारी' असणे आवश्यक आहे, म्हणजेच कर्मचाऱ्याचा त्या दिवसाचा पगार कापला जाऊ नये.

अपवादात्मक स्थितीसाठी सवलत: ज्या आस्थापनांना पूर्ण दिवस सुटी देणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही, अशा ठिकाणी कर्मचाऱ्यांना मतदानासाठी किमान २ ते ३ तासांची सवलत देणे अनिवार्य आहे. मात्र, ही सवलत देताना कर्मचाऱ्याला मतदानासाठी पुरेसा वेळ मिळेल याची खात्री मालकांनी करणे गरजेचे आहे.

तक्रार कुठे करावी?

जर एखादी कंपनी किंवा मालक मतदानासाठी सुटी नाकारत असेल किंवा कामावर येण्यासाठी सक्ती करत असेल, तर कर्मचारी थेट अपर कामगार आयुक्त किंवा कामगार उपायुक्त कार्यालयाकडे आपली तक्रार नोंदवू शकतात. नियम मोडणाऱ्यांविरोधात निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार फौजदारी कारवाई केली जाऊ शकते.

## शब्दकोडे क्र. 63



आडवे शब्द

१. कातीव दगड ३. नेहमी पटकन विसरणारा ६. वाडवडील १०. आरडाओरडा, दंगा १२. दोस्त १३. व्याह्यांची बायको १४. अयोध्येची नदी १६. दाट, निबीड १८. पृथ्वी २०. उत्साह २१. हे खाऊन रूप येते का? २३. किडा २५. वाईट सवय २७. अस्थी २९. अंतःकरण ३१. पराक्रमी पुरुष ३२. आदरणीय ३३. दरवाजा ३५. कापड इ.चा पृष्ठभाग ३६. तृण ३८. आच, उष्णता ३९. घर ४०. मातीच्या भांड्याचा तुकडा ४१. वरणाची दाळ ४२. निर्दय ४३. उद्यान ४४. जवळीक, मैत्री ४७. स्वीकृत, अंगीकृत ५०. अप्रिय, न आवडणारा ५१. सुळका ५१अ. अफवा, वदंता ५२. बालीश ५४. भगिनी ५५. पुष्कळ ५७. तंग ५८. क्रीडा ५९. वेखंड ६०. कुरडईच्या जोडीने तळला जाणारा पदार्थ ६१. बाण ६३. बंध ६४. विलंब ६५. टिंगल ६६. कायद्याला या हजार असतात! ६९. चकित नजर ७१. लाह्यांचा होम ७४. बासरी ७५. चुलता ७७. उणे ७८. न टाळण्याजोगे ७९. बरोबरीचा ८०. शर्विलक ८१. झेप ८३. घोडा ८४. पुष्पगुच्छ ८५. खेळातील चाल ८६. आईचा भाऊ ८७. गगन ८८. रहायला घर नसलेला

उभे शब्द

१. दिवा (हिंदी) २. वेडावाकडा ४. यज्ञातील सरपण ५. निशा ६. अस्तनी ७. नातवंडाचा मुलगा ८. राष्ट्र ९. वारा १०. डिंक ११. ताजे, तरतरीत १३. स्वच्छ, निर्मळ १५. रूधिर १७. फांदी १९. सेपे २२. डोंगर २४. मसाल्याच्या पदार्थातील एक २६. धीर, बळ, उत्साह २८. व्याकूळ, व्याकूळ करणारे २९. बंदुकीची गोळी ३०. विश्व ३४. गंध, परिमळ ३५. एक 'बोलका' पक्षी ३७. रंग ३८. अटकसत्र ३९. कोडगा ४०. संसद सदस्य ४३. वक्रता ४५. मीठ ४६. वार्धक्य ४८. भेग ४८अ. उगाळलेल्या औषधाचा ओढा ४९. आगेकूच ५०. '... म्हणते रे गीत, परि सारे हलक्याने, आड येते रीत' ५२. पोळ्या करण्याचे साधन ५३. मिठी ५४. नोकर ५७. गृह ६१. लाज ६२. परिचय ६५. सूत कातण्याचे साधन ६७. आक्रोश ६८. हट्ट ७०. घट्ट दह्याची वडी ७२. अग्नी ७३. रगेल, माजखोर ७६. चोळीचा एक प्रकार ८१. पार्वती ८२. एक अप्सरा ८३. सध्या संकटात सापडलेला वन्य प्राणी

### शब्दकोडे क्र. 62 चे उत्तर

आडवे उत्तर

१.तांब्या ३.सालाबादप्रमाणे ७.पसायदान १०.बदनामी १२.कीर १४.वलय १६.वाफ १७.पटाव १९.विलाप २१.मोड २१अ.जबान २२.काकी २३.शत्रुघ्न २५.गज २६.उमाळा २७.वावटळ २८.अन्य २९.वडील ३१.राजी ३३.भेजा ३४.टग्या ३५.पत ३६.परवानगी ३८.तस्त ४०.वाटप ४२.सौर ४३.राख ४४.रंक ४५.केशव ४६.बटीक ४७.वग ४९.वाहवा ५२.बंडलबाज ५४.रघुवीर ५८.यार ६०.गादी ६१.थाबा ६३.वजन ६५.अंगद ६७.म्यान ६८.विनाशकाले ७१.ठाव ७३.काक ७४.कमनीय ७७.जमीन ७९.अनावर ८१.गरुड ८२.गोरा ८३.गगन ८५.तरुणपण ८६.केली ८८.सागर ८९.थक्क ९०.नाद ९१.नड

उभे उत्तर

१.तांबडा २.ब्याद ३.सामील ४.बाकी ५.दरवाजा ६.मान्य ८.साठा ९.दाखला ११.नावड १३.लाट १५.यजमान १७.पाकीटमार १८.वश १९.विघ्न २०.पर्जन्य २१.मोजडी २२.बाळा २२अ.काव २४.त्रुटी २५.गवगवा २७.वाजी २८.अजातशत्रू ३०.लटपटीत ३१.रात ३२.जनक ३५.परवड ३६.पखवाज ३७.वारंवार ३९.स्तव ४१.टब ४८.गलथान ५०.दैवी ५१.जयाअंगी ५२.बंदी ५३.बाबा ५५.घुटका ५६.रव ५७.मौन ५९.रग ६२.विनाकारण ६४.जननी ६६.दशमी ६७.म्याव ६९.शठ ७०.लेकरू ७२.कनात ७५.मडके ७६.यथा ७७.जरासा ७८.नगर ८०.वरुण ८१.गणना ८४.नथ ८७.लीन

# सैलानी बाबा यात्रेच्या तयारीला वेग

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला पूर्वतयारीचा आढावा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा तालुक्यातील मौजे पिंपळगाव सराई येथील सैलानी बाबा दर्गा परिसरात साजऱ्या होणाऱ्या सैलानी बाबा यात्रा महोत्सवाच्या तयारीला गती आली आहे. या यात्रेच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समितीची आढावा बैठक त्यांच्या कार्यालयात मंगळवारी घेण्यात आली. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सैलानी बाबा यात्रा महोत्सव २५ फेब्रुवारी ते १२ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. यात्रेदरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २ मार्च २०२६ रोजी नारळाची होळी पेटविण्यात येणार असून, त्यानंतर यात्रेला खऱ्या अर्थाने सुरुवात होईल. ८ मार्च २०२६ (पंचमी) रोजी संदल मिरवणूक काढण्यात येणार आहे. ही मिरवणूक ग्रामपंचायत पिंपळगाव सराई येथून मुजावर परिवाराच्या संदल घरातून रात्री ८ वाजता निघून गावातील प्रमुख मार्गांवरून परिक्रमा करत जंगलगाठ रस्त्याने सुमारे ४ किमी अंतर पार करून रात्री १२ वाजता सैलानी बाबा दर्गा येथे पोहोचेल. १२ मार्च २०२६ रोजी फातेखानी कार्यक्रमानंतर सैलानी बाबा ट्रस्टकडून प्रसाद वाटप करून यात्रेची सांगता होईल.

सैलानी बाबा दर्गा हे सर्व जाती-धर्मीय भाविकांचे श्रद्धास्थान असल्याने यात्रेत बुलढाणा जिल्ह्यासह मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र तसेच महाराष्ट्राबाहेरील आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात आदी राज्यांतून




मोठ्या संख्येने भाविक सहभागी होतात. यंदा अंदाजे ५ ते ७ लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

यात्रा व्यवस्थापनासाठी महसूल विभाग, पोलीस यंत्रणा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, आरोग्य विभाग, परिवहन विभाग, विद्युत वितरण कंपनी, सैलानी बाबा दर्गा ट्रस्ट, मुजावर, ग्रामपंचायत पिंपळगाव सराई व घाटनांद्रा, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर परिषद बुलढाणा/चिखली, पशुसंवर्धन विभाग, अन्न व औषध प्रशासन आदी विभागांच्या तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर आढावा घेतला.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील म्हणाले की, सैलानी बाबा यात्रा परिसराची अधिकाऱ्यांनी पाहणी करून रस्ते दुरुस्ती, कडेकोट पोलीस बंदोबस्त व सीसीटीव्ही यंत्रणा, अखंड वीजपुरवठा, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, दर्गा व शौचालयांसाठी पाणी-साफसफाई व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, वाहतूक नियोजन व बॅरिकेटिंगसह पार्किंग, भाविकांसाठी एसटीच्या अतिरिक्त बस सेवा, हाराशीद्वारे दुकानदारांना जागा, अन्न पदार्थ तपासणी, नारळ होळी व बळी प्रथेसाठी स्वतंत्र जागा, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी जनजागृती फलक, आरोग्य शिबिरे (डॉक्टर, रुग्णवाहिका व औषधसाठा), अग्निशमन वाहने, मदत कक्ष व उद्घोषणा यंत्रणा तत्काळ कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले.

यात्रा शांततामय, सुरक्षित व सुव्यवस्थित पार पडावी, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

## वृत्तविशेष...

### अनोळखी मृतदेह आढळला: ओळखणाऱ्यांनी संपर्क करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पोलीस स्टेशन बुलढाणा ग्रामीण येथून अनोळखी महिलेला दिव्या फाँडेशन बुलडाणा यांच्या कडुन अपघात विभाग जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलडाणा येथे उपचारासाठी दि. १२ जानेवारी २०२६ रोजी भरती करण्यात आले. उपचारा दरम्यान तिचा मृत्यू झाला. या मृत महिलेला ओळखणाऱ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

प्राप्त माहितीनुसार, अनोळखी महिलेचे वय ६५ ते ६८ वर्ष, उंची १६० सेमी, बांधा सळपातळ, सावळा रंग, डोक्याची केस पांढरे, अंगात लाल व पांढऱ्या रंगाचा गाऊन व कपाळावर मध्यभागी टिकली गोंदलेले दिसत आहे. या वर्णनाचा महिलेचा कोणी नातेवाईक किंवा मित्रमंडळी ओळखत असल्यास पोलीस स्टेशन, बुलढाणा(ग्रामीण) येथे किंवा तपास अधिकारी ९८२३७१७१८० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### तृतीयपंथीयांसाठी पोर्टल व हेल्पलाईन सेवा सुरु; सुविधेचा लाभ घ्यावा: सहाय्यक आयुक्त यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र शासनाचा ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) कायदा, २०१९ व त्याअंतर्गतचे नियम २०२० संपूर्ण देशात लागू झाले आहेत. या कायद्याच्या अंमलबजावणीअंतर्गत तृतीयपंथीय व्यक्तींसाठी केंद्र शासनाने स्वतंत्र पोर्टल व नॅशनल हेल्पलाईन क्रमांक सुविधा उपलब्ध करुन दिले आहे. या सुविधांचा जिल्ह्यातील सर्व तृतीयपंथीय समुदायातील व्यक्तींनी लाभ घ्यावा, असे आवाहन, सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.

तृतीयपंथीय समुदायासाठी केंद्र शासनाने http://transgender.dosje.gov.in हे पोर्टल उपलब्ध करून दिले आहे. या पोर्टलवर तृतीयपंथीय व्यक्तींना अधिकृत ओळखपत्र मिळविण्यासाठी ऑनलाइन अर्ज करता येतो. तसेच नॅशनल हेल्पलाईन क्रमांक १४४२७ सुद्धा सुरू करण्यात आले आहे. या हेल्पलाईनद्वारे तृतीयपंथीय व्यक्तींना विविध शासकीय योजनांची माहिती, अर्ज प्रक्रियेबाबत मार्गदर्शन, येणाऱ्या अडचणींचे निराकरण तसेच तक्रारी नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### मृत महिलाची (सरस्वती मालटे) ओळख पटविण्याबाबत आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा (ग्रामीण) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वरवंड येथील दिव्य प्रकल्प आश्रमात



वास्तव्यास असलेल्या एका महिलेचा मृत्यू झाला असून, तिची ओळख पटविण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

आश्रमाचे संचालक अशोक काकडे यांनी सदर मृत महिलेचे नाव सरस्वती प्रल्हाद मालटे, वय ४६ वर्षे, रा. दिव्या फाउंडेशन, वरवंड, ता.जि. बुलढाणा असे सांगितले आहे. मात्र ही महिला बेवारस असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. मृत महिलाचे नातेवाईक अथवा ओळखीची व्यक्ती असल्यास पोलीस स्टेशन, बुलढाणा(ग्रामीण) येथे किंवा तपास अधिकारी ८८८८८११७१४ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अर्जांसाठीचे पोर्टल २२ जानेवारीपर्यंत सुरू

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना (एनएमएमएसएस) अंतर्गत २०२५-२६ साठी नुतनीकरणासाठी पात्र असलेले तसेच २०२४-२५ मधील डी-डुप्लिकेशन प्रक्रियेत समाविष्ट असलेले तथापि विहित कालावधीत अर्ज करू शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी एनएसपी २.० पोर्टल २२ जानेवारी २०२६ पर्यंत पुन्हा सुरू करण्यात आले आहे.

राज्यातील सर्व संबंधित शाळांनी पात्र विद्यार्थ्यांचे नूतनीकरण अर्ज एनएसपी २.० पोर्टलवर २२ जानेवारीपूर्वी ऑनलाईन सादर करून घ्यावेत. त्याचप्रमाणे सर्व अर्जांची प्रथम स्तर आणि द्वितीय स्तर पडताळणी २२ जानेवारीपर्यंत पूर्ण करावी. कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नसल्याने सर्व प्रक्रिया तातडीने पूर्ण करुन पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ वेळेत मिळेल, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन शिक्षण संचालक (योजना) कृष्णकुमार पाटील यांनी केले आहे.

## ही नवी प्रथा कशासाठी? आता काय बदललं? राज ठाकरेंकडून प्रश्नांचा भडीमार; शिवतीर्थवर संतापले; उद्धव ठाकरे पाहत राहिले

**मुंबई/प्रतिनिधी :** निवडणूक आयोगाने मंगळवारी ५ वाजता प्रचार संपल्यानंतर उमेदवारांना घरोघरी जाऊन लोकांना भेटण्याची परवानगी दिल्याने मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी संताप व्यक्त केला आहे. हारलेली गोष्ट जिंकण्यासाठी निवडणूक आयोग मदत करत आहे असा थेट आरोप राज ठाकरेंनी केला आहे. हा जर जुना नियम असेल तर विधानसभा, लोकसभा किंवा त्याच्या आधीच्या निवडणुकांमध्ये का केलं नाही? अशी विचारणाही राज ठाकरेंनी केली आहे. राज ठाकरे यांनी शिवतीर्थवर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी उद्धव ठाकरेही त्यांच्यासोबत होते. काल ५ वाजता प्रचार थांबला आणि आपण ज्या काही निवडणुका इतकी वर्ष पाहत आहोत त्यात निवडणुकीचा प्रचार संपल्यानंतर दुसरा दिवस रिकामा आणि नंतरच्या दिवशी मतदान ही आतापर्यंतची प्रथा आजपर्यंत होती. या सरकारला काय हवं आहे यासाठी निवडणूक आयोग काम करत आहे, असा आरोप राज ठाकरेंनी केला आहे.

तुम्ही ५ वाजेपर्यंत मतदारांना भेटू शकता. ही नवी प्रथा, पद्धत कुठून आली याची कल्पना नाही. विधानसभा, लोकसभेला किंवा त्याआधी का नव्हती? ही आता कशासाठी आली? मतदारांना भेटू शकता, पण पत्रकं वाटू शकत नाही. पैसे वाटू शकता असं म्हणायचं असेल. ही मुभा का दिली? आता काय बदललं आहे? नव्याने या गोष्टी कशासाठी आणल्या जात आहेत?,''



असे अनेक प्रश्न राज ठाकरेंनी विचारले आहेत.

पाडू नावाचं एक मशीन आणलं आहे. कोणत्याही राजकीय पक्षाला नवं मशीन दाखवलेलं नाही. उद्धव ठाकरेंनी निवडणूक आयोगाला पत्र दिलं असून, नवीन युनिट दाखवण्यास सांगितल आहे. हे काय मशीन आहे हे दाखवावं, सांगावं इथपर्यंतही आयोग गेलेलं नाही. त्याव उत्तर देत नाहीत. त्यांच्याकडून आता आम्हाला अपेक्षाही नाही. रोज कायदे बदलत आहेत. जनतेने प्रश्न विचारायला हवेत. सरकारला जी गोष्ट हवी आहे ती करुन देण्यासाठी निवडणूक आयोग आहे का? त्यांना ज्या सुविधा हव्या आहेत त्या मिळवून देण्यासाठी निवडणूक आयोग काम करत आहे का?,'' असंही राज ठाकरेंनी विचारलं आहे.

''सर्वांना सांगायचं आहे की सतर्क राहा. बूथवर कोणतया गोष्टी सुरु आहेत यावर लक्ष ठेवा. सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारांवर लक्ष ठेवा. कशाप्रकारे पैसे वाटले जात आहेत हे दिसत असून, अनेक रिल्स बाहेर येत आहेत. भाजपा, शिंदेंकडून पत्रकाच्या आत लपवून पैसे वाटले जात आहेत.

## उसणे पैसे मागण्यासाठी गेली अनब ६३ वर्षीय म्हाताऱ्याच्या तावडीत सापडली; विरारमध्ये संतापजनक प्रकार

दैनिक आपला विदर्भ

**विरार/प्रतिनिधी :** विरार पूर्व परिसरातून माणुसकीला काळीमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. उसने पैसे मागण्यासाठी गेलेल्या एका निरागस अल्पवयीन मुलीचा एका ६३ वर्षीय वृद्धाने विनयभंग केला. इतकेच नाही तर या संतापजनक प्रकारानंतर त्याने मुलीला जीवे मारण्याची धमकीही दिली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार,ही घटना १२ जानेवारी रोजी घडली. पीडित मुलगी घरगुती गरजेसाठी काही पैसे उसने मागण्यासाठी आरोपीच्या दुकानात गेली होती. पीडित मुलगी अल्पवयीन आहे हे माहित असूनही आरोपीच्या मनात पाप आले. त्यावेळी दुकानात दुसरे कोणीही नसल्याची संधी साधून या ६३ वर्षीय नराधमाने तिला जवळ बोलावले आणि तिचा विनयभंग केला.

या भयानक प्रकारानंतर आरोपीने मुलीला काही पैसे दिले पण सोबतच एक अट घातली ''जर याबद्दल कोणाला काही सांगितले, तर तुला जीवे मारून टाकेन'' अशी धमकी त्याने त्या मुलीला दिली. या धमकीमुळे मुलगी प्रचंड घाबरली होती. मात्र तिने हिंमत दाखवून हा सर्व प्रकार आपल्या कुटुंबियांना सांगितला. आपल्या मुलीसोबत घडलेला हा प्रकार ऐकून पालकांना मोठा धक्का बसला. त्यांनी तातडीने विरार पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार नोंदवली.

## अरुणोदय विशेष सिकलसेल तपासणी व जनजागृती मोहीम; १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सर्व आदिवासी प्रकल्प क्षेत्रांमध्ये तसेच जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये अरुणोदय विशेष सिकलसेल तपासणी मोहीम शासनाच्या निर्देशांनुसार राबवली जाणार आहे. ही मोहिम १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविली जाणार असून या तपासणी शिबिरांचा लाभ नागरिकांनी, विशेषतः आदिवासी व उच्च जोखमीच्या समूहातील व्यक्तींनी घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

अरुणोदय विशेष सिकलसेल तपासणी व जनजागृती मोहीम जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य विभागामार्फत उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्र स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सिकलसेल आजार हा आनुवंशिक रक्तविकार असून त्याबाबत वेळेवर तपासणी, अचूक निदान व योग्य उपचार आवश्यक आहेत. नागरिकांमध्ये या आजाराविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने बुलढाणा जिल्ह्यातील सर्व आदिवासी प्रकल्प क्षेत्रे तसेच तालुक्यांमध्ये ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

मोहीमेदरम्यान सिकलसेल रक्त तपासणी शिबिरे, कौटुंबिक समुपदेशन, जनजागृती व्याख्याने, शाळा व महाविद्यालयांमध्ये आरोग्य शिक्षण कार्यक्रम, तसेच फिल्ड स्तरावर घरभेटी, तपासणी व फॉलोअप करण्यात येणार आहेत. याशिवाय सिकलसेल रुग्णांच्या उपचार व औषध उपलब्धतेबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे दिली.

## जनता कनिष्ठ महाविद्यालय अंजनी खुर्दच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात उपकरण निर्मितीमध्ये सुयश

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महारचिकना :** दिनांक ६ व ७ जानेवारी २०२६ ला विवेकानंद विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज हिवरा आश्रम या ठिकाणी आयोजित जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय अंजनी खुर्द चा विद्यार्थी कुणाल दादाराव गंगे व योगेश जाधव यांनी शेतकऱ्यांच्या विविध समस्या लक्षात घेता कृषी क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त मल्टीपर्पज स्टिक तयार केली.

या उपकरणाने दिव्यांग प्रवर्गातून उपकरण निर्मितीमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. सदर उपकरण निर्मितीमध्ये त्यांना विज्ञान शिक्षक श्री राजेश पाटील सर यांचे मार्गदर्शन लाभले. दिनांक ७/१/२०२५ ला विवेकानंद विद्यामंदिर हिवरा आश्रम येथे आयोजित बक्षीस वितरण समारंभात श्री.जगनजी





मुंढे साहेब उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद बुलडाणा यांनी कुणाल गुंगे व श्री राजेश पाटील सर यांचा यथोचित सत्कार केला.

आज दिनांक ८/१/२०२५ जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय अंजनी खुर्द येथे आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष श्री बाळकृष्णजी राठी व प्रमुख अतिथी श्री उद्धव ढाकणे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जि.प.शाळा महारचिकना,प्राचार्य श्री कैलास बावस्कर, पर्यवेक्षक श्री विजय जाधव हे उपस्थित होते.

जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री बाळकृष्णजी राठी व प्रमुख पाहुणे यांनी यशस्वी विद्यार्थी कुणाल गुंगे व योगेश जाधव यांचा शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला तसेच श्री.बाळकृष्णजी राठी व प्रमुख पाहुणे यांनी मार्गदर्शक शिक्षक श्री.पाटील सर यांचा शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. जनता विद्यालयाचे प्राचार्य श्री.बावस्कर सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय अंजनी खुर्द विद्यार्थी उपक्रम निर्मितीमध्ये आपल्या कल्पकतेमुळे तसेच मार्गदर्शक शिक्षकांच्या मार्गदर्शनातून यशस्वी झाल्याबद्दल त्याचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांच्या यश प्राप्तीसाठी कठोर मेहनत, कर्तव्यनिष्ठता व सकारात्मक दृष्टिकोन असेल तर कोणताही अडथळा त्यांना यशापासून दूर ठेवू शकत नाही. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांना नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय प्रदर्शनात सुद्धा विद्यार्थ्यांनी चांगले प्रदर्शन करावे यासाठी सर्वांकडून त्यांना शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय भाषणात संस्थाध्यक्ष श्री. बाळकृष्णजी राठी यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल कौतुक करत राज्यस्तरीय प्रदर्शनात सुद्धा क्रमांक प्राप्त करावा यासाठी सदिच्छा व्यक्त केली व विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी याप्रमाणे प्रगती करावी यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन घ्यावे असे सूचित केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सुनील पवार सर तर आभार प्रदर्शन श्री दीपक जाधव सर यांनी केले व अध्यक्षांच्या अनुमतीने कार्यक्रम संपन्न झाला.